ePaper
**जबलपूर हादरले! वादळामुळे बर्गी धरणात क्रूझ उलटली; 40 पैकी 5 जणांचे मृतदेह सापडले**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 01 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






पक्षप्रवेश करताच बच्चू कडूंना विधानपरिषदेची लॉटरी

## 'एक्झिट पोल'चे अंदाज भाजपने पसरवले!

# ममतांचा दावा; TMC @ २२६ पार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एक्झिट पोलचे अंदाज फेटाळत ते “भाजप कार्यालयातून पसरवलेले आणि पैशाने चालवलेले” असल्याचा गंभीर आरोप केला आहे. जनतेवर पूर्ण विश्वास व्यक्त करत, २०२६ च्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेस २२६ पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा ठाम दावा त्यांनी केला.**

### काय म्हणाल्या ममता बॅनर्जी?

१. एक्झिट पोल “भाजप कार्यालयातून पसरवलेले” असल्याचा आरोप

२. २०२६ निवडणुकीत २२६+ जागांचा TMC चा दावा

३. ९२.६७% विक्रमी मतदानाचा उल्लेख

४. केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराचा आरोप (ED, CBI, IT)

५. मतदानादरम्यान हिंसाचार आणि दडपशाहीचे आरोप

६. EVM संदर्भात सतर्क राहण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओत बॅनर्जी यांनी मोठ्या प्रमाणातील मतदानाबद्दल जनतेचे आभार मानले. दोन टप्प्यांत झालेल्या मतदानात तब्बल ९२.६७ टक्के मतदान झाल्याचे त्यांनी सांगितले. “इतक्या उष्णतेत आणि दबावातही लोकांनी मतदान केले, याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत,” असे त्या म्हणाल्या.

एक्झिट पोलवर टीका करत त्यांनी आरोप केला की, “टीव्हीवर दाखवले जाणारे आकडे भाजपकडूनच पसरवले गेले आहेत. हे आमच्या कार्यकर्त्यांचा मनोबल खच्ची करण्याचा प्रयत्न आहे.” त्यांनी केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर होत असल्याचाही आरोप करत ED, CBI आणि आयकर विभागाचा उल्लेख केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही त्यांनी निशाणा साधत, “बंगालची संस्कृती, इतिहास आणि परंपरा त्यांना माहिती नाही,” अशी टीका केली. तसेच मतदारांना पैसे देऊन मतदानावर प्रभाव टाकल्याचाही आरोप त्यांनी भाजपवर केला.

मतदानादरम्यान हिंसाचार झाल्याचा आरोप करत बॅनर्जी यांनी केंद्रीय दलांवरही टीका केली. “महिला आणि मुलांवर मारहाण झाली, काही ठिकाणी मृत्यूही झाला,” असे त्या म्हणाल्या. याबाबत त्यांनी संबंधित कुटुंबांना मदतीचे आश्वासन दिले.

याशिवाय, EVM मध्ये छेडछाड होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांना आणि उमेदवारांना मतमोजणीदरम्यान सतर्क राहण्याचे आवाहन केले. “प्रत्येक टप्प्यावर लक्ष ठेवा, निष्काळजीपणा करू नका,” असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील २९४ मतदारसंघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. तृणमूल काँग्रेसला आपल्या कल्याणकारी योजनांवर विश्वास आहे, तर भाजप भ्रष्टाचार आणि कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर प्रचार करत आहे. पश्चिम बंगालसह आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुडुचेरी या राज्यांच्या निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहेत.



> “टीव्हीवर दाखवले जाणारे एक्झिट पोल हे भाजप कार्यालयातून पसरवलेले आहेत. आम्ही २०२६ मध्ये २२६ पेक्षा जास्त जागा जिंकू. TMC ला मोठा जनाधार आहे. भाजप खोटे आकडे पसरवत आहे. पंतप्रधानां बंगाल समजला नाही. त्यांनी मतदारांना पैसे वाटले. आम्ही मतमोजणी प्रक्रियेत दक्ष आहोत. “माँ माती मानुष” हाच आमचा अजेंडा आहे.
>
> \- **ममता बॅनर्जी**, मुख्यमंत्री, पश्चिम बंगाल.

### TMC चा आत्मविश्वास शिगेला!

ममता बॅनर्जी यांनी एक्झिट पोलचे अंदाज पूर्णतः फेटाळत ते भाजपकडून पसरवलेले असल्याचा गंभीर आरोप केला. विक्रमी ९२.६७% मतदानावर विश्वास व्यक्त करत तृणमूल काँग्रेसला प्रचंड जनाधार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर, मतदानादरम्यान हिंसाचार आणि मतदारांवर दबाव आणल्याचे आरोपही त्यांनी केले. तसेच EVM संदर्भात सतर्क राहण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन करत, “माँ माती मानुष” या अजेंड्यावरच जनता पुन्हा विश्वास ठेवेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# खासगी शाळांसाठी शुल्क परतावा धोरण

## राज्यातील खासगी शाळांसाठी शुल्क परतावा धोरण निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त

**महाईन्यूज । पुणे**

**देशभरातील उच्च शिक्षण संस्थांतील प्रवेश ठरावीक काळात रद्द केल्यास विद्यार्थ्यांना शुल्काचा परतावा करण्यात येतो. त्या धर्तीवरच आता राज्याच्या शालेय शिक्षणातही शुल्क परतावा धोरण येण्याची शक्यता निर्माण झाली असून, खासगी शाळांतील प्रवेश रद्द केल्यास पालकांना शुल्काचा परतावा करता येईल का, या दृष्टीने शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे.**



उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) यांचे शुल्क परतावा धोरण आहे. त्यानुसार प्रवेश घेतल्यापासून ठरावीक मुदतीत प्रवेश रद्द केल्यास काही रक्कम वजा करून उर्वरित रक्कम विद्यार्थ्याला परत केली जाते. या धोरणाची देशपातळीवर अंमलबजावणी केली जाते. तसेच राज्यात केंद्रीभूत ऑनलाइन पद्धतीने राबवल्या जाणाऱ्या अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतही विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा केला जातो. मात्र, राज्यातील खासगी शाळांसाठी शुल्क परताव्याचे धोरण अस्तित्त्वातच नसल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शालेय स्तरावर शुल्क परतावा धोरण तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांसाठी शिक्षण शुल्क व इतर शुल्क आकारण्याबाबत तरतुदी आहेत. याबाबत तक्रारी असल्यास महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ अंतर्गत तरतुदी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. मात्र, शाळेत प्रवेश झाल्यानंतर प्रवेश रद्द झाल्यास शुल्काचा परतावा कसा करावा, या बाबत शासनाचे सद्यस्थितीत धोरण अस्तित्वात नाही. त्यामुळे पालकांच्या शाळांविरोधात तक्रारी प्राप्त होतात. विद्यार्थ्याने भरलेल्या शुल्काचा परतावा प्रवेश रद्द झाल्यानंतर करता येईल का, या बाबत समिती नियुक्त करून शासनास शिफारस करणे योग्य राहील. त्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या अध्यक्षतेखालील समिती नियुक्त करण्याचा निर्णय शिक्षण आयुक्तांनी घेतला आहे. समितीला अहवाल सादर करण्यासाठी एका महिन्याची मुदत देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### समितीमध्ये कोणाचा समावेश?

शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये सेवानिवृत्त शिक्षण संचालक दिनकर टेमकर, धाराशिव जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, नाशिक जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रजकर, प्राथमिक शिक्षण संचालनालयातील अधीक्षक प्रवीण गायकवाड, आयकॉन पब्लिक स्कूलचे राहुल अडसुरे, कळवा येथील कावेरीताई पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचे देविदास पवार, पालक प्रतिनिधी जयश्री देशपांडे, पुण्यातील उरळी कांचन येथील अजिंक्य चॅरिटेबल फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक डॉ. आप्पासाहेब जगदाळे, त्र्यंबकेश्वर नाशिक येथील नारायणी फाउंडेशनच्या संचालिका सोनाली भोसले, सिंघानिया ग्रुप ऑफ स्कूलच्या डॉ. रेवती श्रीनिवास, डीएव्ही पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका जयश्री खांडेकर, बिशप पब्लिक स्कूलचे शेन मॅकफरसन, सिग्नेट पब्लिक स्कूलच्या डॉ. अजिता परभट यांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# मेट्रोसाठी वाढवलेल्या FSI धोरणावर सवाल; मेधा कुलकर्णींचा जाब

**महाईन्यूज । पुणे**

**सार्वजनिक वाहतुकीला पर्याय म्हणून पुण्यात मेट्रो आणली आणि मेट्रो चालावी म्हणून मेट्रोमार्गावर चार चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देऊन गर्दी वाढवली. हे धोरण शहरीकरण, पर्यावरणासाठी व्यवहार्य आहे का? पौड फाटा-चतु:शृंगी रस्ता जास्त वापरला जाणार नाही, असे तज्ज्ञ सांगत असताना त्या रस्त्याचा आग्रह का धरायचा?**



शहरात वारंवार येणाऱ्या पुरामागे सदोष नदीकाठ विकास कार्यक्रम, नदीप्रवाहातील अतिक्रमणे आहेत का? असे मुद्दे चर्चेला आले पाहिजेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी शहराच्या व्यापक हितासाठी काम करणे आवश्यक आहे, अशा शब्दांत खासदार मेधा कुलकर्णी यांनी लोकप्रतिनिधींना ठणकावले.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था शताब्दी संवाद मालिकेअंतर्गत ‘विकसित महाराष्ट्र 2047 : शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी मार्गदर्शक दिशा’ या कार्यशाळेचे उद्घाटन खासदार कुलकर्णी यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आला. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे महासंचालक जयराज फाटक, उपसंचालक रवी रंजन गुरू आदी या वेळी उपस्थित होते.

खा. कुलकर्णी म्हणाल्या, ‘पुणे शहरातील आत्ताच्या लोकसंख्येसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करणासाठी मेट्रो आणली. मेट्रोसाठी म्हणून मेट्रोमार्गाभोवती चार ‘एफएसआय’ देऊन गर्दी वाढवली. हे धोरण शहरीकरण, पर्यावरणासाठी व्यवहार्य आहे का? पौड फाटा-चतु:शृंगी रस्त्याचा वापर फार होणार नाही, असे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगत असताना या रस्त्याचा आग्रह आपण का धरायचा? शहरात पूर येण्याच्या समस्येमागे सदोष नदीकाठविकास कार्यक्रम, नदीप्रवाहातील अतिक्रमणे आहेत का? असे मुद्दे चर्चिले गेले पाहिजेत. पावसाचे पाणी शहरातच जमिनीत मुरवता येईल का? असे पदपथांचे, पावसाळी पाण्याच्या वाहिन्यांचे प्रारूप तयार करता येईल.

### तरच शहरांत शाश्वत विकास होईल

रस्ते बांधताना सेवा वाहिन्या एका बाजूला डक्टमध्येच असणे अपेक्षित असते. तो डक्ट उघडला की काम होईल आणि रस्ते खोदावे लागणार नाहीत. जंगली महाराज रस्त्यावर सेवा वाहिन्या बाजूला असल्याने हा रस्ता खोदावा लागत नाही. सेवा वाहिन्यांच्या कामासाठी रस्ते खोदावे लागत असतील, तर त्याला स्मार्ट कसे म्हणायचे? शहरे वाढत असताना व्यापक विचार करून काय योग्य? हा सर्व विचार केल्यास शहरांत शाश्वत विकास होईल, असेही खासदार कुलकर्णी यांनी सांगितले.

# विधान परिषदेसाठी इच्छुक राष्ट्रवादीचे योगेश बहल, विलास लांडे, नाना काटे यांचा भ्रमनिरास!

## बहल यांच्या शिष्टमंडळाने मुंबईत भेट घेतली, पण पार्थ पवारांनी काॅंग्रेसचा घाट दाखवला!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**राज्यातील रिक्त झालेल्या ९ विधान परिषदेच्या जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. यापैकी ७ जागा भाजपा, १ शिवसेना आणि १ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांच्या वाट्याला आली आहे. राष्ट्रवादीतील १ जागेसाठी आठ-दहा नावे चर्चेत होती. या जागेवर पिंपरी-चिंचवडमधून शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांपैकी एकाला संधी मिळेल, असे सांगितले जात होते.**




दरम्यान, माजी शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल यांनी एक शिष्टमंडळ तयार केले. चार दिवसांपूर्वी त्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी भेट घेतली. विधान परिषदेवर बहल यांना संधी मिळाली. त्यांनी सलगत सातव्यांदा महापालिकेत प्रतिनिधीत्व केले आहे, म्हणजे ३०-३५ वर्षे बहल नगरसेवक आहेत. पक्षाशी एकनिष्ठ आहेत. त्यामुळे त्यांची वर्णी लागावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मात्र, पार्थ पवार यांनी विधान परिषदेवर झिशान सिद्धकी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आणि पिंपरी-चिंचवडमधील बहल समर्थकांचा भ्रमनिरास झाला. आज सिद्धकी यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

वास्तविक, पक्षातून अनेक जणांची नावे होती चर्चेत, परंतु मुंबईत पक्षाची ताकद वाढविण्याच्या झिशान सिद्दीकीला उमेदवारी देण्यात आली आहे. झिशान सिद्दीकी हे विधानसभा निवडणुकीत वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडणूक लढले होते, परंतु शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार वरूण सरदेसाई यांनी त्यांचा पराभव केला होता. झिशान सिद्धकी हे आधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये होते आणि मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. ऑक्टोबर 2024 मध्ये त्यांनी अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ते महाराष्ट्राचे माजी मंत्री स्वर्गीय बाबा सिद्दीकी यांचे पुत्र आहेत. ऑक्टोबर 2024 मध्ये बाबा सिद्दीकी यांची हत्या झाली होती.

### राष्ट्रवादी फुटीच्या उंबरठ्यावर..!

२०२४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत दाखल झालेल्या सिद्धीकी कुटुंबाला विधानसभेची उमेदवारी, त्यात पराभव झाल्यानंतर पुन्हा विधान परिषदेवर संधी देण्याची भूमिका पक्षश्रेष्ठींनी घेतली. मात्र, पक्षाच्या स्थापनेपासून दिवंगत अजित पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिलेल्या माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांना संधी मिळाली नाही. योगेश बहल यांचा एक गट, काटेंचा एक गट आणि लांडे यांचा गट असे तीन गट शहर राष्ट्रवादीत आहेत. महापालिका स्वीकृत नगरसेवकपदावरुन अगोदरच नाराजीचा सूर असताना पुन्हा विधान परिषदेत डावलल्यामुळे स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीतील अस्वस्थता वाढलेली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतील काही नेते २०२९ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गट अथवा भाजपाशी जुळवून घेण्याबाबत चाचपणी करीत आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# वाकड-दत्त मंदिर रस्ता वादात; निधी वळवल्याचा आरोप तीव्र

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवडमधील वाकड-दत्त मंदिर रस्ता रुंदीकरण प्रकल्प पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, या कामासाठी मंजूर केलेला निधी इतर विकासकामांकडे वळवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या आरोपांमुळे संपूर्ण प्रकल्पाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.**

> "४५ मीटर रस्त्याचे आश्वासन दिले गेले, अतिक्रमणही हटवले गेले. पण आता निधीच दुसरीकडे वळवला गेला असेल तर हा नागरिकांशी थेट विश्वासघात आहे. प्रशासनाने स्पष्ट उत्तर द्यावे."
> - सचिन लोंढे, उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन



### काय आहे नेमका वाद?

- २०२१-२२ मध्ये वाकड-दत्त मंदिर रस्ता रुंदीकरणासाठी निधी मंजूर
- ४५ मीटर रुंदीकरणाचे अधिकृत आश्वासन प्रशासनाकडून
- अतिक्रमण हटवण्यासाठी मोठी कारवाई
- मात्र प्रत्यक्ष काम ठप्प
- आता निधी इतर कामांकडे वळवल्याचा आरोप

### नागरिकांचे प्रश्न

- रस्त्यासाठी मंजूर निधी नेमका कुठे गेला?
- ४५ मीटर रुंदीकरणाचे आश्वासन अपूर्ण का राहिले?
- निधी वळवण्याचा निर्णय कोणी घेतला?
- या प्रकल्पाला जबाबदार कोण?

### गंभीर आर्थिक अनियमितता...

वाकड-दत्त मंदिर रस्ता हा हिंजवडी आयटी हब आणि पिंपरी-चिंचवड शहराला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. वाहतूक ताण लक्षात घेऊन ४५ मीटर रुंदीकरणाचा विकास आराखड्यात समावेश करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी रस्ता केवळ २४ मीटरपर्यंत मर्यादित राहिल्याने नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. निधी वळवल्याचा आरोप खरा ठरल्यास हा केवळ प्रशासकीय ढिसाळपणा नसून गंभीर आर्थिक अनियमिततेचा मुद्दा ठरू शकतो. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनावर नागरिक आणि स्थानिक संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वाकड-दत्त मंदिर रस्ता रुंदीकरणासाठी मंजूर करण्यात आलेला निधी मूळ प्रकल्पावर न वापरता इतर कामांसाठी वळवण्यात आल्याचे प्राथमिक माहितीवरून स्पष्ट होत असल्याचा आरोप नागरिक संघटनांनी केला आहे. त्यामुळे ४५ मीटर रुंदीकरणाचा महत्त्वाचा प्रकल्प निधीअभावी रखडल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महापालिकेच्या अधिकृत स्तरावर अद्याप निधी वळवल्याबाबत स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही. मात्र निधीअभावी काम थांबले असल्याचे कारण पूर्वी देण्यात आले होते. त्यामुळे निधीचा प्रत्यक्ष वापर कुठे झाला, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

# मराठी अस्मिता अन् विकासाची यात्रा..!



## भूमिका

**१ मे हा दिवस महाराष्ट्रासाठी दुहेरी महत्वाचा आहे. एकीकडे "महाराष्ट्र दिन" म्हणून मराठी अस्मिता, भाषिक राज्यनिर्मिती आणि सांस्कृतिक ओळख यांचा उत्सव साजरा होतो; तर दुसरीकडे "आंतरराष्ट्रीय कामगार दिन" म्हणून श्रमिकांच्या कष्टांचा आणि हक्कांचा सन्मान केला जातो.**




या दोन्ही दिनांचा संगम महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतीक आहे. १९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातून राज्याची स्थापना झाली. हा केवळ प्रशासकीय निर्णय नव्हता, तर जनतेच्या संघर्षाचे फलित होते. हुतात्म्यांचे बलिदान, जनआंदोलने आणि एकजूट यामुळे महाराष्ट्राचा जन्म झाला. त्यामुळे हा दिवस आत्मसन्मान आणि प्रेरणेचा आहे.

कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर १८८६ मधील शिकागो आंदोलनाची आठवण येते. आठ तास कामाच्या हक्कासाठी झालेल्या या लढ्यामुळे आजचे कामगार कायदे अस्तित्वात आले. हा दिवस श्रमिकांच्या योगदानाचा सन्मान करतानाच त्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधतो.

महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य औद्योगिक आणि आर्थिक राज्य आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यांसारख्या शहरांनी देशाच्या प्रगतीत मोठा वाटा उचलला आहे. या विकासामागे लाखो कामगारांचे श्रम आहेत. बांधकाम, औद्योगिक, शेती आणि असंघटित क्षेत्रातील कामगार राज्याची खरी ताकद आहेत. तरीही त्यांना अनेकदा अपुरे वेतन, असुरक्षितता आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव भोगावा लागतो.

आज राज्यासमोर ग्रामीण-शहरी असमतोल, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि पर्यावरणीय ताण अशी अनेक आव्हाने आहेत. तसेच स्थलांतरित आणि असंघटित कामगारांचे प्रश्नही गंभीर आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात गिग इकॉनॉमी आणि करार पद्धतीमुळे कामाचे स्वरूप बदलत असून सामाजिक सुरक्षा अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर कौशल्याधारित शिक्षण, स्थानिक रोजगारनिर्मिती, लघु-मध्यम उद्योगांना चालना आणि कामगार कायद्यांची अंमलबजावणी यावर भर देणे गरजेचे आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेत कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी नव्या धोरणांचीही आवश्यकता आहे.

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन आपल्याला सांगतात की राज्याची खरी ताकद जनतेमध्ये आहे. विकासाचा अर्थ प्रत्येकाच्या जीवनमानात सुधारणा होणे हा आहे. मराठी अस्मिता आणि सामाजिक न्याय या दोन्ही मूल्यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अपेक्षा आहे की त्यांनी सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन धोरणे राबवून औद्योगिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय आणि समतोल विकास साधावा. महाराष्ट्राला अधिक सक्षम, समृद्ध आणि न्यायपूर्ण राज्य बनवण्याची हीच खरी दिशा ठरेल.

जय महाराष्ट्र..!

## प्रासंगिक »

### बढाईखोर माणूस

**एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले.**

आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही.

तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला ? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.' हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

- तात्पर्य : आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली असून त्याचे थेट परिणाम भारतीय अर्थकारणावर दिसू लागले आहेत. इंधन, खते आणि आयात खर्चात झालेल्या प्रचंड वाढीमुळे महागाईचा दबाव वाढत आहे.

# मध्यपूर्वेतील संघर्षाचे भारतीय अर्थकारणावर सावट



त्यामुळे सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू झालेल्या संघर्षामुळे जागतिक बाजारपेठ ढवळून निघाली आहे. समुद्री मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्याने आयात-निर्यात साखळी विस्कळीत झाली आहे. भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशासाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. विशेषतः कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ ही अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक ठरत आहे. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८० टक्के तेल आयात करतो. त्यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की त्याचा थेट परिणाम देशांतर्गत इंधन दरांवर होतो. पेट्रोल-डिझेलचे दर वाढल्यास वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम सर्व वस्तूंच्या किमतींवर होऊन महागाई वाढते. ही साखळी सध्या स्पष्टपणे दिसत आहे.

महागाईचा फटका सामान्य नागरिकांना बसू नये, यासाठी केंद्र सरकारने कर कपात करून इंधन दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, यामुळे सरकारी तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडत आहे. दुसरीकडे, तेल कंपन्यांनाही तोट्याचा सामना करावा लागत आहे. ही परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यास आर्थिक ताण अधिक वाढण्याची शक्यता आहे. युद्धाचा परिणाम केवळ इंधनापुरता मर्यादित नाही. खतांच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ ही शेती क्षेत्रासाठी चिंतेची बाब आहे. युरिया आणि डीएपीसारख्या खतांचे दर झपाट्याने वाढल्याने शेतकऱ्यांवरील खर्च वाढणार आहे. त्याचा परिणाम उत्पादन खर्चावर होऊन अन्नधान्य महाग होण्याची शक्यता आहे. परिणामी महागाई आणखी वाढू शकते.

तसेच, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने औद्योगिक उत्पादनावरही परिणाम होत आहे. निर्यात कमी झाल्यामुळे व्यापारी तूट वाढत आहे. रुपयावर दबाव येत असून त्याला स्थिर ठेवण्यासाठी आर्थिक संस्थांना मोठी कसरत करावी लागत आहे. एकूणच, मध्यपूर्वेतील संघर्षाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक पातळ्यांवर होत आहे. ही परिस्थिती लवकर सुरळीत झाली नाही, तर महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक ताण अधिक तीव्र होऊ शकतो. त्यामुळे सरकारने दीर्घकालीन उपाययोजना करताना ऊर्जा स्वावलंबन, पर्यायी स्रोतांचा वापर आणि आर्थिक शिस्त यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



न बोलेसी करा वाचा ।
उपाधीचा संबंध ॥१॥

एका तुमच्या नामाविण ।
अवघा सीण कळतसे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पक्षप्रवेश करताच बच्चू कडूंना विधानपरिषदेची लॉटरी

## माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचा अधिकृतपणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश

**महाईन्यूज । मुंबई**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करताच माजी मंत्री बच्चू कडू यांना विधानपरिषदेचे तिकीट मिळाले... माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निर्णयाला पाठिंबा जाहीर करत काँग्रेसने अखेर विधानपरिषद निवडणुकीत उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला... विधानपरिषद उमेदवारीत डावलल्याने ठाण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभावशाली नेते शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली.**



विधान परिषदेच्या निवडणुकीच्या उमेदवारीवरून विरोधकांच्या महाविकास आघाडीमध्ये निर्माण झालेला तिढा अखेर सुटला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विधानपरिषद निवडणुकीतून आपला पक्ष माघार घेणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे आता महाविकास आघाडीकडून ठाकरेसेनेचे उमेदवार अंबादास दानवे हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेसाठी दानवे यांचे नावाची घोषणा केल्यानंतर काँग्रेसचे नेते नाराज झाले होते. या निवडणुकीत आपला उमेदवार उतरवण्याचे संकेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काँग्रेसच्या इतर नेत्यांनी दिले होते. विधानसभेत महाविकास आघाडीचे संख्याबळ कमी असल्यामुळे ठाकरे गट, शरद पवार यांचा पक्ष आणि काँग्रेसला मिळून एकच उमेदवार देण्याचा पर्याय होता. त्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादीने उद्धव ठाकरे यांच्या नावाला पाठिंबा दिला होता. मात्र, ठाकरे यांनी निवडणुकीपासून दूर राहत अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा केली होती. अखेर काँग्रेसने दानवे यांच्या नावाला पाठिंबा दिला आहे.

ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे प्रभावशाली नेते आनंद परांजपे यांचे नाव विधान परिषद उमेदवारीसाठी चर्चेत होते. मात्र, पक्षाने ऐनवेळी झिशान सिद्दीकी यांना संधी देण्याचा निर्णय घेऊन परांजपे यांना डावलले. यामुळे नाराज झालेले परांजपे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या संपर्कात असल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली. या घडामोडीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एकच खळबळ उडाली. सरतेशेवटी खुद्द परांजपे यांनी सर्व अफवांचे खंडण करीत याबाबत स्पष्टीकरण दिले. “मी शिंदेसेनेत जाणार या केवळ अफवा आहेत. मी कुठेही जाणार नसून पक्षातच राहणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुतीचे नेते आहेत, त्यांची विविध कामानिमित्ताने भेट होत असते, अशी प्रतिक्रिया आनंद परांजपे यांनी दिली.

### बच्चू कडूंना विधानपरिषदेची लॉटरी

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी आज शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यादरम्यान शिंदे गटात प्रवेश करताच बच्चू कडू यांना विधानपरिषदेची उमेदवारी मिळाली. त्यांच्या पक्षप्रवेशानंतर खुद्द एकनाथ शिंदे यांनी याबाबतची घोषणा केली. आपण पक्षप्रवेशासाठी ठेवलेल्या सर्व अटी एकनाथ शिंदे यांनी मान्य केल्याचे यावेळी बच्चू कडू म्हणाले. शिवसेनेचा धनुष्यबाण मी हाती घेत आहे. काल-परवा याबद्दल बरीच चर्चा झाली आहे. आमचे सगळे मुद्दे शिवसेनेने स्वीकारले आहेत. पक्षाची राजकीय ताकद मजबूत करण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे करत राहू, पण त्याबदल्यात आम्हाला शेतकऱ्यांची, दिव्यांगांची ताकद हवी आहे. त्यावर कोणतीही तडजोड होणार नाही. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग मंत्रालय उभे राहिले आणि आता त्याच्या बळकटीकरणासाठी काम झाले पाहिजे, असेही ते म्हणाले.

# पायधूनी विषबाधा प्रकरण; मयत अब्दुल्ला होता फसवणूक प्रकरणातील मुख्य साक्षीदार

**महाईन्यूज । मुंबई**

**दक्षिण मुंबईतील पायधूनी परिसरात घडलेल्या विषबाधा प्रकरणाला आता एक नवे आणि धक्कादायक वळण मिळाले आहे. या घटनेत मृत्यू पावलेला तरुण, अब्दुल्ला डोकाडिया, हा एका जुन्या आणि गंभीर गुन्ह्यातील महत्त्वाचा साक्षीदार असल्याची माहिती समोर आली आहे. या नव्या खुलाशामुळे अब्दुल्लाचा मृत्यू हा केवळ अपघात होता की त्यामागे एखादा मोठा कट रचला गेला होता, याद्दष्टीने पोलीस आता तपास करत आहेत.**



डी. एन. नगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या गुन्ह्यात अब्दुल्ला डोकाडिया हे केवळ मध्यस्थ नसून, ते या प्रकरणातील मुख्य साक्षीदार होते. बिल्डरपर्यंत पैसे पोहोचवण्यामध्ये अब्दुल्ला यांचा थेट सहभाग असल्याने, त्यांची साक्ष या खटल्याचा निकाल फिरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. विशेष म्हणजे, दीर्घ प्रतीक्षेनंतर २०२६ मध्ये या प्रकरणाची सुनावणी न्यायालयात सुरू होणार होती.

एकीकडे ७ वर्षांनंतर प्रकरणाची सुनावणी तोंडावर आलेली असतानाच, दुसरीकडे अब्दुल्ला यांचा विषबाधेमुळे झालेला मृत्यू अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. ज्या प्रकरणाची सुनावणी २०२६ मध्ये होणार होती, त्यातील मुख्य साक्षीदाराचा अशा प्रकारे मृत्यू होणे हा केवळ योगायोग आहे की साक्ष दडपण्यासाठी रचलेले कारस्थान, असा संशय व्यक्त केला जात आहे.

पायधूनी पोलीस आता या प्रकरणातील तांत्रिक बाबींसोबतच, २०१९ मधील त्या फसवणुकीच्या गुन्ह्याचा आणि संबंधित विकासकाचा या घटनेशी काही संबंध आहे का, याचा कसून तपास करत आहेत. या 'मोठ्या ट्विस्ट'मुळे आता या मृत्यू प्रकरणातील गुंतागुंत अधिकच वाढली आहे.

विशेष म्हणजे, दीर्घ प्रतीक्षेनंतर २०२६ मध्ये या प्रकरणाची सुनावणी न्यायालयात सुरू होणार होती. एकीकडे ७ वर्षांनंतर प्रकरणाची सुनावणी तोंडावर आलेली असतानाच, दुसरीकडे अब्दुल्ला यांचा विषबाधेमुळे झालेला मृत्यू अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. ज्या प्रकरणाची सुनावणी २०२६ मध्ये होणार होती, त्यातील मुख्य साक्षीदाराचा अशा प्रकारे मृत्यू होणे हा केवळ योगायोग आहे की साक्ष दडपण्यासाठी रचलेले कारस्थान, असा संशय व्यक्त केला जात आहे. पायधूनी पोलीस आता या प्रकरणातील तांत्रिक बाबींसोबतच, २०१९ मधील त्या फसवणुकीच्या गुन्ह्याचा आणि संबंधित विकासकाचा या घटनेशी काही संबंध आहे का, याचा कसून तपास करत आहेत. या 'मोठ्या ट्विस्ट'मुळे आता या मृत्यू प्रकरणातील गुंतागुंत अधिकच वाढली आहे. या प्रकरणात आर्थिक व्यवहारांची साखळी, संबंधित व्यक्तींचे कॉल रेकॉर्ड आणि व्यवहारांचे डिजिटल पुरावे तपासले जात असून, तपास यंत्रणा प्रत्येक दुव्याची छाननी करत आहे. मृत्यूपूर्वी अब्दुल्ला यांनी कोणाशी संपर्क साधला होता, याचाही तपास सुरू असून, त्यातून काही महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, या घटनेमुळे संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, न्यायालयीन प्रक्रियेत याचा मोठा परिणाम होऊ शकतो.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, सन २०१९ मध्ये डी. एन. नगर पोलीस ठाण्यात एका फसवणुकीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. जोगेश्वरीतील एका बड्या बिल्डरने एका महिलेकडून मोठी रक्कम घेतली होती. धक्कादायक बाब म्हणजे, बिल्डरने ही रक्कम स्वीकारण्यासाठी स्वतः न जाता अब्दुल्ला डोकाडिया यांना पाठवले होते. महिलेने दिलेले हे पैसे बिल्डरने नंतर परत केले नाहीत, ज्यामुळे संबंधित महिलेने २०१९ मध्ये बिल्डरविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल केली होती.

# गोव्यात आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषद

## कोंकणी सुपुत्र डॉ. सुनील मांजरेकर आणि पापाचसॉर्न मीपा यांचा संयुक्त पुढाकार

**महाईन्यूज** । गोवा

**महाराष्ट्र–गोवा उद्योग विस्तारासाठी गेली तीन दशके सातत्याने कार्यरत असलेल्या 'गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम'चे ग्लोबल अध्यक्ष आणि कोंकणचो सुपुत्र डॉ. सुनील विनायक मांजरेकर यांनी आता थायलंडमधील फुकेत येथे मराठी–कोंकणी उद्योगविस्तारासाठी नवे दालन खुले केले आहे. त्यांच्या 'एसक्युसीसी प्रॉपर्टीज एलएलसी' (दुबई) आणि थायलंडमधील प्रसिद्ध 'फुकेत ९' या रिअल इस्टेट कंपनीच्या संयुक्त विद्यमाने गोव्यातील 'द झुरी व्हाइट सॅण्ड्स रिसॉर्ट अँड कॅसिनो' येथे खास व्यवसाय परिषदेचे नुकतेच आयोजन करण्यात आले.**



गोव्यातील प्रस्थापित व उदयोन्मुख उद्योजकांना फुकेतमधील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय मालमत्ता गुंतवणुकीच्या संधी, समान विचारांच्या गुंतवणूकदारांशी संपर्क आणि उच्च परताव्याच्या संधींबाबत या परिषदेत सविस्तर माहिती देण्यात आली. विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध बांधकाम उद्योजक व समाजसेवक श्री. आशुतोष खांडेकर यांच्यासह पन्नासहून अधिक उद्योजक मान्यवर उपस्थित होते.

गोव्यासारखेच जागतिक पर्यटनाचे केंद्र असलेले थायलंड येथील लोकप्रिय फुकेत शहर हे हिंद महासागराच्या निसर्गरम्य किनाऱ्यांनी सजलेले, सांस्कृतिक वैविध्य, व्यापार परंपरा आणि आदरातिथ्य यामुळे जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षण ठरत आहे. विशेष म्हणजे, 'फुकेत ९'च्या माध्यमातून पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराची प्रतिकृती जगभरातील पर्यटकांसाठी आकर्षण ठरत असून, मराठी–कोंकणी संस्कृतीचा जागतिक विस्तार करण्याचा अनोखा उपक्रमही राबविला जात आहे. या प्रकल्पासाठी गोव्यात श्री. आशुतोष खांडेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

फुकेतमध्ये निवासी व व्यावसायिक प्रकल्प उभारून भारतीय—विशेषतः मराठी आणि कोंकणी गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित, आधुनिक आणि उच्च परताव्याच्या संधी निर्माण करण्यात येत आहेत. समुद्रकिनाऱ्यालगत उभे राहणारे हे प्रकल्प हॉटेल्स, सदनिका (कॉन्डोमिनियम्स) आणि आलिशान व्हिला अशा विविध पर्यायांमध्ये उपलब्ध असून, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, सुरक्षितता आणि संपूर्ण मालमत्ता व्यवस्थापन सेवा प्रदान करतात.

डॉ. मांजरेकर यांनी पुढे सांगितले की, फुकेतमधील प्रकल्पांमधून साधारण १०% पर्यंत परतावा अपेक्षित असून, सुमारे ७०% वार्षिक वापरक्षमतेमुळे गुंतवणूकदारांना सातत्यपूर्ण उत्पन्न मिळू शकते. तसेच, संपूर्ण मालमत्ता व्यवस्थापन 'फुकेत ९'कडूनच केले जाणार असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा अत्यंत सोयीस्कर पर्याय ठरणार आहे.

या परिषदेची सुरुवात करण्यापूर्वी डॉ. सुनील व्ही. मांजरेकर आणि मिस पापाचसॉर्न मीपा (Kae) यांनी गोव्याचे माननीय मुख्यमंत्री, डॉ प्रमोद सावंतजी यांची विशेष भेट घेऊन त्यांना फुकेत ९ बद्दल माहिती दिली. माननीय मुख्यमंत्री त्यांना या प्रकल्पासाठी विशेष शुभेच्छा दिल्या असून तेथील गणपती मंदिराला भेट देण्याची विनंती डॉ. सुनील व्ही. मांजरेकर आणि मिस पापाचसॉर्न मीपा (Kae) यांनी केली आहे.

> "भारतीय संस्कृती, परंपरा आणि विशेषतः गोवा व कोंकणी समाजाची 'अतिथी देवो भव' संस्कृती मला नेहमीच आकर्षित करत आली आहे. फुकेत आणि गोवा यांच्यात अनेक साम्यस्थळे आहेत—निसर्ग, समुद्रकिनारे आणि सांस्कृतिक संपन्नता. या दोन्ही ठिकाणांतील नातेसंबंध अधिक दृढ व्हावेत आणि गोव्यातील उद्योजकांनी फुकेतमधील संधींचा लाभ घ्यावा, हीच आमची प्रामाणिक इच्छा आहे."
>
> - मिस पापाचसॉर्न मीपा (KAE).

> "गोव्याचो व्यापारी आत्मा आनी जागतिक दृष्टिकोन एकत्र येता, तेव्हा मोठे अवसर तयार जाता. फुकेत हांव केवळ पर्यटन केंद्र ना, तर एक मजबूत गुंतवणूक केंद्र जालो आसा. आमका खात्री आसा की कोंकणी उद्योजकांनी ह्या संधीचो फायदा घेतलो, तर ते जागतिक स्तरावर आपली ओळख अजून भक्कम करतात."
>
> - डॉ. सुनील व्ही. मांजरेकर.

## पाकिस्तानचा अमेरिकेला धक्का; इराणसाठी नवे भूमार्ग, होर्मुझ नाकेबंदीवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज** । लाहोर

**शांतता चर्चेत मध्यस्थ म्हणून पुढे येणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेवर आता संशय व्यक्त केला जात आहे. कारण, अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकेबंदी करून इराणवर आर्थिक दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला असताना, पाकिस्तानने इराणला मदतीचा हात देत भूप्रदेशातून व्यापारासाठी सहा नवे मार्ग खुले केले आहेत.**



या निर्णयामुळे इराणला रशिया, चीनसह इतर देशांशी व्यापार सुरू ठेवणे सुलभ होणार आहे. त्यामुळे अमेरिकेच्या निर्बंधांचा प्रभाव कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पाकिस्तान सरकारने या सहा मार्गांची अधिकृत घोषणा केल्याने या घडामोडींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, अमेरिकेकडून पाकिस्तानच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा तज्ज्ञ डेरेक ग्रॉसमन यांनी स्पष्ट शब्दांत टीका करत म्हटले आहे की, "या मार्गांमुळे अमेरिकेच्या निर्बंधांना फटका बसू शकतो आणि इराणला नाकेबंदी टाळून इंधन व्यापार सुरू ठेवणे शक्य होईल."

पाकिस्तानवर दुटप्पी भूमिका घेत असल्याचा आरोपही होत आहे. एकीकडे तो शांतता प्रक्रियेत मध्यस्थी करत असताना, दुसरीकडे इराणला मदत करत असल्यामुळे त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वी इस्रायलनेही पाकिस्तानच्या मध्यस्थी भूमिकेबाबत शंका व्यक्त केली होती, आणि आता अमेरिकेकडूनही अशाच प्रतिक्रिया येत आहेत. होर्मुझवरील नाकेबंदीच्या माध्यमातून अमेरिका इराणवर आर्थिक निर्बंध लादण्याचा प्रयत्न करत आहे. आर्थिक दबाव वाढल्यास इराणला अमेरिकेचा प्रस्ताव मान्य करणे भाग पडेल, असे अमेरिकेचे मत आहे. पण, पाकिस्तानने सहा मार्ग उपलब्ध करून दिल्याने हा ट्रम्प यांच्या प्रयत्नांना मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे.

### इराणकडूनही प्रतिक्रिया

याच पार्श्वभूमीवर, इराणकडूनही सूचक प्रतिक्रिया देण्यात आली आहे. "पाकिस्तान आमचा मित्र आहे, पण मध्यस्थ म्हणून योग्य नाही," असे इराणच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. एकूणच, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांना या निर्णयामुळे धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पाकिस्तानने दिलेल्या या सहा मार्गांमुळे होर्मुझ नाकेबंदीचा परिणाम कमी होईल का, याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे.

# ‘पेड्डी’मध्ये श्रुती हासनचा धमाकेदार डान्स



दक्षिणात्य सुपरस्टार राम चरण याचा आगामी ‘पेड्डी’ हा सिनेमा सध्या जोरदार चर्चेत आहे. चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच त्यातील एका खास गाण्याने सगळ्यांचे लक्ष वेधले आहे. कारण या गाण्यात श्रुती हासन (Shruti Haasan ) स्पेशल डान्स करताना दिसणार आहे. आणि त्यासाठी तिने तब्बल ३ कोटी रुपये मानधन घेतल्याची चर्चा रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ‘पेड्डी’ (Peddhi) मधील हा डान्स खूप भव्य पद्धतीने शूट करण्यात आला आहे. हैदराबादमध्ये खास मोठा सेट उभारण्यात आला असून, या गाण्याच्या शूटिंगसाठी श्रुती हासनने ४ दिवस दिले. कमी कालावधीत शूट होणाऱ्या या गाण्यासाठी इतकी मोठी फी घेतल्यामुळेच सध्या हा विषय चर्चेचा ठरला आहे. या गाण्याला आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे संगीत. प्रसिद्ध संगीतकार ए आर रहमान यांनी या गाण्याला संगीत दिले आहे. त्यामुळे गाणं केवळ व्हिज्युअल्समुळेच नाही, तर संगीतामुळेही मोठं हिट ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चित्रपटातील हे गाणं प्रेक्षकांसाठी मोठं आकर्षण ठरणार आहे. राम चरण आणि श्रुती हासन ही जोडी याआधीही एकत्र झळकली आहे आणि त्यांच्या केमिस्ट्रीला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. त्यामुळे ‘पेड्डी’मधील त्यांचा हा हाय-एनर्जी डान्स चाहत्यांसाठी खास ठरणार आहे. चित्रपटाच्या स्टारकास्टबद्दल बोलायचं झालं तर, या सिनेमात जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तिची निवड ही चिरंजीवी यांच्या शिफारशीवर झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे या चित्रपटाकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिक वाढल्या आहेत.

## मृणाल ठाकूरचा ‘डकैत’ लवकरच ओटीटीवर



मृणाल ठाकूरचा ‘डकैत’ हा सिनेमा थिएटरमध्ये प्रदर्शित होऊन अजून महिना पूर्णही झालेला नाही, तोच आता ओटीटीवर येण्याची चर्चा जोरात सुरू झाली आहे. १० एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर अपेक्षित यश मिळाले नाही. तरीही आता ओटीटीवर तो कसा प्रतिसाद मिळवतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मृणाल ठाकूर ही गेल्या काही वर्षांत खूप लोकप्रिय झाली आहे. तिचा प्रवास टेलिव्हिजनपासून सुरू झाला. ‘कुमकुम भाग्य’ या मालिकेत तिने साकारलेली बुलबुल ही भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली होती. त्यानंतर तिने सिनेमात पाऊल ठेवले आणि ‘सीता रामम’, ‘सुपर ३०’, ‘जर्सी’, ‘लस्ट स्टोरीज २’ यांसारख्या चित्रपटांतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. ‘डकैत’ या सिनेमात तिच्यासोबत आदिवी शेष मुख्य भूमिकेत दिसतो. याशिवाय प्रकाश राज आणि अनुराग कश्यप यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. दमदार कलाकार असूनही हा सिनेमा थिएटरमध्ये फारसा गाजू शकला नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ‘डकैत’ हा सिनेमा ८ मे २०२६ रोजी ओटीटीवर रिलीज होण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत अजून अधिकृत घोषणा झालेली नाही. विशेष म्हणजे हा चित्रपट एकाच वेळी तेलुगु, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदी या भाषांमध्ये उपलब्ध होणार असल्याचे सांगितले जात आहे.



## ‘मर्दानी ३’च्या यशावर राणी मुखर्जी खुश

बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जी सध्या तिच्या ‘मर्दानी ३’ या चित्रपटाच्या यशामुळे खूप आनंदी आहे. ‘मर्दानी’ या फ्रँचायझीमधील तिचा ‘शिवानी शिवाजी रॉय’ हा दमदार पोलीस अधिकारी असलेला रोल प्रेक्षकांच्या मनात खोलवर घर करून बसला आहे. थिएटरमध्ये चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवरही लोकप्रिय ठरला आहे. राणी मुखर्जीने (Rani Mukerji) या यशाबद्दल बोलताना सांगितले की, ‘मर्दानी ३’चा प्रवास तिच्यासाठी खूप खास आणि भावनिक होता. चित्रपटाने सिनेमागृहात उत्तम कमाई केली आणि अनेक टप्पे गाठले. त्यानंतर जेव्हा हा चित्रपट नेटफ्लिक्स वर प्रदर्शित झाला, तेव्हाही जगभरातील प्रेक्षकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. हा चित्रपट अनेक दिवस ट्रेंडमध्ये राहिला, याचा तिला खूप आनंद आहे. राणीच्या मते, आजच्या प्रेक्षकांची आवड बदलली आहे. आता फक्त मोठ्या स्टार्सवर चित्रपट चालत नाहीत, तर प्रेक्षकांना चांगली कथा आणि ठोस संदेश हवा असतो. समाजाशी संबंधित विषय आणि मजबूत महिला पात्र असलेले चित्रपट प्रेक्षक अधिक आवडीने पाहतात. ‘मर्दानी’ ही मालिका याच कारणामुळे लोकप्रिय ठरत असल्याचे तिने सांगितले. ‘शिवानी शिवाजी रॉय’ या तिच्या भूमिकेबद्दल बोलताना राणी म्हणाली की, हे फक्त चित्रपटातील पात्र राहिले नाही, तर लोकांचा आवाज बनला आहे. महिलांवरील अत्याचार, गुन्हेगारी आणि समाजातील अन्यायाविरुद्ध लढणारी ही व्यक्तिरेखा लोकांना प्रेरणा देत आहे. भारतासह जगभरातील प्रेक्षक या पात्राशी भावनिकरित्या जोडले गेले आहेत, हे तिच्यासाठी मोठे यश असल्याचे तिने नमूद केले.



# रायन रिकल्टनने घडवला इतिहास!

## हैदराबादविरूद्ध सामन्यात खेळताना ऐतिहासिक खेळी


**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात वानखेडे स्टडियममध्ये सामना खेळवला जात आहे. या सामन्याची नाणेफेक जिंकताच हार्दिक पंड्याने फलंदाजीची निवड करत चकित करणारा निर्णय घेतला. वानखेडेचं मैदान हे लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी ओळखलं जातं. पण हार्दिकने घेतलेल्या निर्णय मात्र संघाच्या पथ्यावर पडला आहे. मुंबईने २० षटकांत ५ बाद २४३ धावांचा डोंगर उभारला आहे. या धावांमध्ये सर्वात मोठं योगदान रायन रिकल्टनचं आहे. त्याने या शतकी खेळीसह मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे.**



मुंबई इंडियन्सला या मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवण्यात त्यांचा सलामीवीर रायन रिकेल्टनने फलंदाजीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने या सामन्यात १२३ धावांची शानदार शतकी खेळी केली, ज्यामुळे तो आपल्या नावावर एक मोठा विक्रम नोंदवण्यातही यशस्वी झाला. रायन रिकल्टनला गेल्या २ सामन्यांमध्ये प्लेईंग इलेव्हनमधून वगळण्यात आलं होतं, पण डीकॉकच्या दुखापतीमुळे तो संघात परतला आणि त्याने दमदार पुनरागमन केलं.

रिकल्टनला पुनरागमनाची संधी मिळताच त्याने विल जॅक्ससोबत मिळून संघाला एक मजबूत सुरुवात करून दिली आणि त्यानंतर, जॅक्स बाद झाल्यावर, वेगाने धावा करत डाव सावरला. रिकल्टनने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध अवघ्या ४४ चेंडूंमध्ये आपलं पहिलं आयपीएल शतक पूर्ण केलं. यासह, मुंबई इंडियन्ससाठी सर्वात कमी चेंडूंमध्ये शतक करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी हा विक्रम सनथ जयसूर्याच्या नावावर होता, ज्याने २००८ मध्ये चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध ४५ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं होतं.




# वैभव सूर्यवंशीचं नाव IPL इतिहासात सोनेरी अक्षरात उमटलं!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशी वादळी फॉर्मात आहे. १५ वर्षीय स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी आपल्या बॅटने सातत्याने धुमाकूळ घालत आहे. पण पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात स्फोटक फलंदाजी करूनही वैभवचं अर्धशतक मात्र हुकलं. तो अर्धशतकापासून केवळ ७ धावा दूर असताना झेलबाद झाला. पण तरीही वैभवने आयपीएलमध्ये एक नवीन इतिहास घडवला. ख्रिस गेलला मागे टाकत त्याने पहिलं स्थान गाठलं आहे.**





न्यू चंदीगड येथे पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना खेळवला गेला. या सामन्यात वैभवने पंजाबच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. त्याने पॉवरप्लेमध्ये चौकार-षटकारांची आतिषबाजी करत एक मोठी कामगिरी केली. यासह त्याने ऑरेंज कॅप पटकावली असून त्याने ४०० धावांचा पल्ला पार केला.

राजस्थान रॉयल्ससाठी डावाची सुरुवात करताना सूर्यवंशीने अवघ्या १६ चेंडूंमध्ये ४३ धावा ठोकल्या. या स्फोटक खेळीदरम्यान त्याने पाच षटकार आणि तीन चौकार लगावले. या युवा डावखुऱ्या फलंदाजाने अर्शदीप सिंग, लॉकी फर्ग्युसन आणि मार्को यानसेन यांसारख्या गोलंदाजांवर हल्लाबोल केला. या ४३ धावांच्या खेळीदरम्यान सूर्यवंशीने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला. त्याने या हंगामात ४०० धावा पूर्ण केल्या. वैभव एकाच आयपीएल हंगामात सर्वात कमी चेंडूंमध्ये ४०० धावा करणारा पहिला फलंदाज ठरला. त्याने आंद्रे रसेलचा सात वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला.

२२३ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना, सूर्यवंशीने राजस्थानला दमदार सुरुवात करून दिली. त्याने आपल्या पहिल्याच षटकात १५ धावा कुटल्या, त्यानंतर लॉकी फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर १७ धावा केल्या. राजस्थानने अवघ्या ३.१ षटकांत ५० धावा पूर्ण केल्या. मात्र, एका फुलटॉस चेंडूवर मिड-ऑफला उभ्या असलेल्या श्रेयस अय्यरकडे झेल देऊन तो ४३ धावांवर बाद झाला. पण यानंतर यशस्वी जैस्वालने अर्धशतक शतक झळकावत संघाच्या धावांचा वेग कायम ठेवला. त्यानंतर शुभम दुबे व डोनावन फरेरा यांनी ७७ धावांची भागीदारी रचत संघाला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्सने ४ बाद २२२ अशी मोठी धावसंख्या उभारली. यात मार्कस स्टॉयनिसने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने अवघ्या २२ चेंडूंमध्ये सहा षटकार आणि चार चौकारांसह नाबाद ६२ धावा केल्या. पण, प्रभसिमरन सिंग (५९), प्रियांश आर्य (२९) आणि कूपर कॉनोली (३०) यांचा समावेश असलेल्या पंजाबच्या आघाडीच्या फलंदाजांनी चांगली सुरुवात करून दिली, परंतु त्यांना त्याचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करता आले नाही. अखेरीस स्टॉयनिसने संघाला २२२ धावांपर्यंत पोहोचवलं. प्रत्युत्तरात, राजस्थानने १९.२ षटकांत २२३ धावांचे लक्ष्य पूर्ण केलं.

### सर्वात कमी चेंडूंमध्ये ४०० धावा करणारे खेळाडू

- १६७ – वैभव सूर्यवंशी (२०२६)
- १८८ – आंद्रे रसेल (२०१९)
- १९५ – अभिषेक शर्मा (२०२४)
- १९७ – निकोलस पूरन (२०२५)
- २०० – ग्लेन मॅक्सवेल (२०१४)

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार ।

दि. 01 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# जनगणना २०२७ साठी स्वयं-नोंदणीला सुरुवात

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया असलेल्या जनगणना २०२७ प्रक्रियेला शहरात सुरुवात झाली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून नागरिक तसेच शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांना या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

यंदाच्या जनगणनेत अचूक, पारदर्शक व विश्वसनीय माहिती संकलनावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यासाठी स्वयं-नोंदणी (SELF ENUMERATION) या सुविधेला प्राधान्य देण्यात आले असून, नागरिकांना १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती ऑनलाइन भरता येणार आहे. ही प्रक्रिया सोपी, जलद आणि सुरक्षित असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यानंतर १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरोघरी भेट देऊन माहिती संकलन करणार आहेत. त्या वेळी नागरिकांनी आवश्यक ती माहिती देत प्रगणकांना सहकार्य करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जनगणना ही शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, स्वयं-नोंदणीमुळे नागरिकांचा वेळ वाचतो तसेच माहिती अधिक अचूकपणे नोंदवता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या सुविधेचा लाभ घ्यावा. नागरिकांचा सक्रिय सहभाग हा शहराच्या भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे, असे मत उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी व्यक्त केले.

> “ पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील नियोजनासाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. नागरिकांनी जबाबदारीने सहभागी होऊन अचूक माहिती देणे आवश्यक आहे. हीच माहिती शहराच्या विकासाचा मार्ग ठरवणार आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी,** आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> “ स्वयं-नोंदणी ही प्रक्रिया सोपी आणि सुरक्षित आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने माहिती भरून प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> **- कुलदीप जंगम,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.






# पिंपळे सौदागरमध्ये रखडलेला १८ मीटर रस्ता लवकरच मार्गी!

## प्रशासनाला कडक सूचना : भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची प्रत्यक्ष पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अल्कोव सोसायटीमागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या १८ मीटर रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. स्थानिक नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करत काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.**



या पाहणी दौऱ्यात नगरसेविका अनिताताई काटे आणि नगरसेविका कुंदाताई भिसे यांनीही सक्रिय सहभाग घेत सकारात्मक पाठपुरावा सुरू असल्याचे स्पष्ट केले. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेत रखडण्यामागील तांत्रिक अडचणींची चर्चा करण्यात आली.

रस्त्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात साचलेल्या राडारोड्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. यावर शत्रुघ्न काटे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, “काम पूर्ण होईपर्यंत परिसरात राडारोडा साचू देऊ नका आणि नियमित स्वच्छता राखा,” अशा स्पष्ट सूचना प्रशासन आणि कंत्राटदाराला दिल्या.

कुंजीर कॉलनी परिसरातील रहिवाशांशी संवाद साधत विविध विकासकामांची माहिती देण्यात आली. नागरिकांनी मांडलेल्या समस्या आणि सूचनांवर सकारात्मक प्रतिसाद देत त्या लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन तिन्ही पदाधिकाऱ्यांनी दिले.

### लवकरच रस्ता वाहतुकीसाठी खुला होणार

“पिंपळे सौदागरमधील पायाभूत सुविधा मजबूत करणे हे आमचे प्राधान्य आहे. प्रलंबित कामांमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेत हा १८ मीटर रस्ता लवकरात लवकर पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल,” असे शत्रुघ्न काटे यांनी सांगितले. या पाहणीवेळी महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



“पिंपळे सौदागरमधील नागरिकांना अपूर्ण कामांमुळे कोणताही त्रास सहन करावा लागणार नाही. अल्कोव सोसायटीमागील १८ मीटर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून तो लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला केला जाईल. यासाठी प्रशासनासोबत सतत पाठपुरावा सुरू असून गुणवत्ता आणि वेळेची कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

- **शत्रुघ्न काटे**, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

---

# दिघीतील सीएमई भिंतीलगत बाधित १४ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिघी येथील कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनियरिंग (CME)भिंतीलगत रस्त्याच्या कामामुळे बाधित झालेल्या १४ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रशासनाशी सातत्याने केलेला संवाद आणि समन्वय यामुळे ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्यानंतर नुकतेच उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते बाधित कुटुंबांना घरांबाबतची अधिकृत पत्रे वितरित करण्यात आली. करारनामा पूर्ण झाल्यानंतर लवकरच या कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या घरांचा प्रत्यक्ष ताबा मिळणार आहे.

अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळाल्याने बाधित कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. घर मिळणार असल्याच्या आनंदात काही कुटुंबीयांनी एकमेकांना पेढा भरवून आनंद व्यक्त केला. या संपूर्ण प्रक्रियेत आमदार महेश लांडगे यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका निर्णायक ठरल्याचे प्रशासन स्तरावरूनही मान्य करण्यात आले आहे. “विकासासोबतच कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ नये, प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे,” या भूमिकेतून त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे.

या वेळी माजी नगरसेवक विकास डोळस उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासोबतच मानवी संवेदनशीलता जपत बाधित नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे हीच आपली प्राथमिकता असल्याचेही या निमित्ताने अधोरेखित झाले. दरम्यान, या निर्णयामुळे दिघी परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, बाधित कुटुंबांनी आमदार महेश लांडगे यांचे विशेष आभार मानले आहेत.



“विकासाची कामे करताना कोणताही नागरिक बेघर किंवा बाधित राहू नये, हीच आमची ठाम भूमिका आहे. दिघी येथील सीएमई भिंतीलगत बाधित १४ कुटुंबांचे पुनर्वसन हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून सामाजिक न्यायाचा विजय आहे. प्रशासनाशी सातत्यपूर्ण समन्वय साधत या कुटुंबांना त्यांचे हक्काचे घर मिळवून देणे हे आमचे कर्तव्य होते आणि ते पूर्णत्वास नेण्यात आम्हाला समाधान आहे.”

- **महेश लांडगे**, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



“अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या कुटुंबांना स्वतःचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा आणि प्रशासनाशी समन्वय साधल्यामुळे हा प्रश्न सकारात्मकरीत्या सुटला. नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.”

- **विकास डोळस**, माजी नगरसेवक, भाजपा.

# कॅन्सरवरील आधुनिक उपचार पिंपरी-चिंचवडकरांच्या आवाक्यात!

## थेरगाव येथे होणाऱ्या भव्य कॅन्सर हॉस्पिटलचा सभापती अभिषेक बारणे यांनी घेतला आढावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकातील रुग्णांना कर्करोगावर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध करून देण्यासाठी थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने भव्य कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. या हॉस्पिटलच्या उभारणीचा आणि विविध सुविधांचा आढावा घेण्यासाठी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज, ३० एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली.**



या पाहणी दौऱ्यादरम्यान अभिषेक बारणे यांनी हॉस्पिटल परिसरातील पार्किंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था, ऑक्सिजन आणि पाणी पुरवठा यंत्रणा, तसेच स्वच्छतेच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. रुग्णालयात पुरवल्या जाणाऱ्या संभाव्य आरोग्य सेवांची माहिती घेत असताना त्यांनी कामाचा दर्जा आणि गती याबाबत प्रशासनाला आवश्यक सूचनाही केल्या.

यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. मुसलगी, डॉ. सोनेकर, डॉ. कुलकर्णी यांसह पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

हे रुग्णालय जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असणार आहे. यामध्ये लिनियर ॲक्सिलरेटर, ब्रॅकीथेरपी युनिट्स आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारखी महागडी यंत्रसामग्री बसवण्यात येणार आहे. येथे प्रामुख्याने स्तनाचा, फुफ्फुसाचा, कोलोरेक्टल, प्रोस्टेट आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावर विशेष उपचार केले जातील. तसेच केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, शस्त्रक्रिया, समुपदेशन आणि पुनर्वसन या सेवा एकाच छताखाली मिळतील.

विशेष म्हणजे, येथील उपचारांचे शुल्क 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना' आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांशी सुसंगत ठेवले जाणार असल्याने गरिबांसाठी हे उपचार अत्यंत स्वस्त किंवा मोफत ठरणार आहेत. या दौऱ्याचे औचित्य साधून अभिषेक बारणे यांच्या हस्ते थेरगाव हॉस्पिटलमध्ये अनेक वर्षे आपली निष्कलंक सेवा देणारे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त विशेष गौरव करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. थेरगावमधील या नवीन प्रकल्पामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> "कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा उपचार हा अत्यंत खर्चिक असतो, जो सामान्यांच्या आवाक्याबाहेर जातो. त्यामुळेच थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने हे अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभारले जात आहे. या रुग्णालयामध्ये आम्ही लिनियर ॲक्सिलरेटर आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारख्या जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देत आहोत. महत्त्वाचे म्हणजे, हे उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी जोडले जाणार असल्याने गोरगरीब रुग्णांना येथे मोफत किंवा अत्यंत अल्प दरात सेवा मिळेल. शहरातील एकाही रुग्णाला पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हेच आमचे उद्दिष्ट आहे."
>
> — **अभिषेक बारणे**, सभापती, स्थायी समिती.

# प्रभाग क्र. २५ व २६ मधील अनधिकृत पत्राशेडवर महापालिकेची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २६ मधील जगताप डेअरी ते कस्पटे वस्ती दरम्यानच्या २७ तर प्रभाग क्र. २५ मधील वाकड चौक ते भुजबळ चौक १६ अशा एकूण ४३ अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या पत्रा शेडच्या बांधकामांवर आज सकाळी १० वाजल्यापासून व्यापक कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाई दरम्यान परिसरातील ६३ हजार १८४ चौ. फूट अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या ४३ पत्रा शेडवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. संबधित अनधिकृत पत्राशेड धारकांना देण्यात आलेल्या नोटीस नुसार सदर कारवाई करण्यात आली.**



आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर ड क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी कारवाई वेळी सह शहर अभियंता सुनिल भागवानी, मुख्यालय अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घारगे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, किशोर ननवरे आणि पूजा दूधनाळे यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या कारवाईत बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विजयकुमार सोनवणे, ड क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य अभियंता सुनील शिंदे तसेच उप अभियंता संजय चव्हाण, संजय बंडगर, श्याम गर्गे, विनायक माने, संदीप वैद्य हे सहभागी झाले होते.

या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक असे १५० अधिकारी व कर्मचारी, २४ पोलीस अधिकारी, ९० पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १२० जवान, ६० मजूर, उपस्थित होते. तर अतिक्रमण हटविण्यासाठी २ ट्रक्टर ट्रोली, १६ जेसीबीचां वापर करण्यात आला. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशमन दलाची एक गाडी आणि दोन ॲम्बुलन्स घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवून नागरिकांना सुरक्षित आणि नियोजनबद्ध शहरी सुविधा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच शहरातील कोणतेही अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. असे देखील प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

> शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित, नियोजनबद्ध नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. नियमबाह्य बांधकामांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. संबंधितांनी नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असून अन्यथा अशा बांधकामांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सुरू असलेली ही कारवाई पुढील काही दिवस सातत्याने सुरू राहणार आहे.
>
> - **डॉ. विजय सूर्यवंशी**, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# पिंपरी-चिंचवडमधील संभाजी बारणे यांचा विश्व विक्रम!

## शिवचरित्रावरील ५५१ पुस्तकांच्या संग्रहाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**साहित्य, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणारे थेरगाव येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संभाजी बाळासाहेब बारणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित विविध लेखकांची ९ भाषांतील ५५१ दुर्मिळ पुस्तके संकलित करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या विक्रमाची यथोचित नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली असून, त्याचे प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह २५ मार्च २०२६ रोजी समितीच्या वतीने त्यांना प्रदान करण्यात आले.**




मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड, तमिळ, तेलुगू, गुजराती आणि सिंधी या भाषांतील शिवचरित्रावर आधारित ग्रंथांचा समावेश या संग्रहात आहे. अशा प्रकारचा एवढा मोठा आणि बहुभाषिक पुस्तकसंग्रह करणारे बारणे हे एकमेव असल्याचा दावा त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

या प्रसंगी अण्णासाहेब मगर सांस्कृतिक फाउंडेशनचे अध्यक्ष गोविंद खामकर, गीतकार बाळासाहेब भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

बारणे यांच्या या विक्रमामुळे शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. उच्चशिक्षित असलेले संभाजी बारणे शेती व बांधकाम व्यवसायात कार्यरत असून सामाजिक उपक्रमांमध्येही ते सातत्याने पुढाकार घेत असतात. त्यांच्या संग्रहात शिवरायांच्या ७० हून अधिक धातूंच्या मूर्ती तसेच केंद्र सरकारने जारी केलेल्या दोन रुपयांच्या शिवरायांच्या नाण्यांच्या सुमारे १५०० प्रतींचा संग्रहही आहे.

थेरगाव येथील त्यांच्या कार्यालयात हे दुर्मिळ संग्रह नागरिकांना दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत पाहण्यासाठी खुले ठेवण्यात आले आहे. शिवचरित्र संशोधकांना संदर्भासाठी हे ग्रंथ मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. यापूर्वीही बारणे यांनी पिंपरी-चिंचवडमधील १९७८ ते २०२२ या कालावधीतील १२०० नगरसेवकांच्या व्हिजिटिंग कार्ड्सचा संग्रह करून २०१९ मध्ये इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळवले होते. तसेच वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, नाट्य परिषद आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांचे आजीव सदस्य असलेल्या बारणे यांनी संपादित केलेल्या “पिंपरी चिंचवड वैभव” या कविता संग्रहाचे नुकतेच ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

> “छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील राजा नसून ते विचारांचा अखंड स्रोत आहेत. त्यांच्या जीवनावर आधारित विविध भाषांतील ग्रंथ एकत्र करून हा संग्रह तयार करणे ही माझ्यासाठी केवळ आवड नसून एक जबाबदारी आहे. शिवचरित्राचा अभ्यास, जतन आणि प्रसार हीच माझी खरी सेवा आहे. या कार्याची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने घेतली याचा मला अभिमान आहे, पण त्याहून मोठा आनंद म्हणजे हे साहित्य संशोधक आणि शिवप्रेमींना उपयोगी ठरत आहे.”
>
> – संभाजी बाळासाहेब बारणे, शिवप्रेमी.

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन’ उत्साहात



**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जागतिक पृथ्वी दिनानिमित्त डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, आकुर्डी येथे ‘भारत पर्यावरण कार्यक्रम – भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन २०२६’ उत्साहात पार पडला. हा उपक्रम रिसर्च हाईट्स फाउंडेशन आणि एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.**

कार्यक्रमाला प्राचार्या डॉ. श्रीमती पी. मालथी, समन्वयक डॉ. अशोक मोरे आणि डॉ. सुहास पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विविध विभागांचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

२२ ते २४ एप्रिलदरम्यान ‘पृथ्वी सप्ताह’ अंतर्गत महाविद्यालयात विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने कॅम्पस ग्रीन ऑडिट व कचरा व्यवस्थापन मोहिम राबवली, तर इन्स्ट्रुमेंटेशन आणि कंट्रोल इंजिनीअरिंग विभागाने ‘हरित परिसर’ स्वच्छता अभियान आयोजित केले. माहिती तंत्रज्ञान विभागाने ‘प्लास्टिक मुक्त अभियान’ राबवत जनजागृती केली.

पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात आलेले हे उपक्रम कार्बन फूटप्रिंट कमी करण्यास आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यास उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. ‘विकसित भारत’ संकल्पनेशी सुसंगत असलेला हा पुढाकार संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनाही पूरक ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. डी. वाय. पाटील आकुर्डी शैक्षणिक संकुलाचे चेअरमन मा. सतेज पाटील, प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. तेजस पाटील तसेच संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयाचा हा उपक्रम केवळ शैक्षणिक मर्यादित न राहता शाश्वत भविष्यासाठी नाविन्यपूर्ण पावले उचलण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.


### शून्य प्लास्टिक मोहीम...

आर्टिफिशियल इंटेलिजन्स व डेटा सायन्स विभागाने शाश्वततेची शपथ व ऊर्जा बचतीवरील भित्तीपत्रक सादर केले. रोबोटिक्स अँड ऑटोमेशन विभागाने प्लास्टिकविरोधी जनजागृती मोहीम हाती घेतली. इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागाने नाविन्यपूर्ण शाश्वत कल्पनांवर भर दिला, तर संगणक अभियांत्रिकी विभागाने ‘शून्य प्लास्टिक मोहीम’ राबवून परिसरातील प्लास्टिक कचरा कमी करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. कचरा व्यवस्थापन, अक्षय ऊर्जा, जलसंधारण आणि हरित जीवनशैली यांसारख्या विषयांवर या माध्यमातून प्रभावी प्रबोधन झाले.

**Priyadarshani**

# प्रियदर्शनी स्कूल, मोशीला QS I-GAUGE कडून ब्रॉंझ रेटिंग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**




मोशी येथील प्रियदर्शनी स्कूलने शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठत QS I-GAUGE कडून प्रतिष्ठेचा ब्रॉंझ रेटिंग मिळवला आहे. कठोर आणि स्वतंत्र मूल्यमापन प्रक्रियेनंतर विविध कार्यप्रदर्शन निकष आणि संस्थात्मक मानकांच्या आधारे हा दर्जा प्रदान करण्यात आला.

या मान्यतेमुळे शाळेच्या उच्च दर्जाच्या शिक्षणपद्धती, सक्षम पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेण्यात आली आहे. तसेच, नाविन्यपूर्ण उपक्रम, प्रभावी अध्यापन पद्धती आणि सतत सुधारणा याबाबत संस्थेची ठाम बांधिलकीही अधोरेखित झाली आहे.

या यशामुळे पालक आणि समाजामध्ये शाळेच्या दृष्टीकोन व नेतृत्वाविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला असून, प्रियदर्शनी स्कूलने महाराष्ट्रातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान अधिक बळकट केले आहे. हा ब्रॉंझ रेटिंग एप्रिल २०२८ पर्यंत वैध राहणार आहे. शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी या यशाचा आनंद साजरा करत असून, भविष्यात आणखी उच्च उद्दिष्टे गाठण्यासाठी ते कटिबद्ध असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.